



Education : An Ennobling Influence

Gopal Krishna Gokhale


GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS, PUNE

# संघर्षाकडून सहजीवनाकडे

## वन्यजीवांमुळे शेतमालचे नुकसान: भरपाई प्रक्रिया आणि मार्गदर्शन

२०२५




Centre for Sustainable Development

२०२५


लेखन आणि संकलन: प्रा. डॉ. मिलिंद वाटवे
संपादन: वैदेही दांडेकर

प्रकाशक:
शाश्वत विकास केंद्र,
गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था,
पुणे

Gokhale Institute of Politics and Economics

Centre for Sustainable Development

# वनविभागाकडे नुकसान भरपाईची मागणी कशी करावी ?



**अपील अ १ आणि अ ४ या अपिलाचा मजकूर कारणाप्रमाणे बदलू शकतो म्हणून त्याचा ठराविक साचा पुढील माहिती मध्ये दिलेला नाही.**

प्रति,
मा. वनपरिक्षेत्रअधिकारी
वनपरिक्षेत्रकार्यालय
---------------------------------------------------

अर्जदार :- श्री / श्रीमती.
राहणार--------------तहसिल--------------जिल्हा----------------

विषय :- वन्यप्राण्यांनी केलेल्या शेतपिकांची नुकसान भरपाई मिळणेबाबत.

महोदय,

सविनय विनंती आहे की, माझे शेतातील--------या पिकाचे नुकसान जंगली रानडुकर/निलगाय (रोही) /वानर/------- या जंगली जनावरानी दि.   /   / २०   रोजी केले असून एकूण नुकसान अंदाजे--------------रूपयांचे आहे. माझे शेत मौजा------येथे असून त्याचा सर्व्हे नंबर -------हा असून आराजी(एकूण)-------आहे.

झालेल्या नुकसानीचा तपशील आणि एकूण नुकसानीचा मी केलेला  अंदाज सोबत जोडला आहे. तरी नियमाप्रमाणे पंचनामा करून मी नोंदलेला तपशील बरोबर असल्याची खात्री करावी आणि त्याप्रमाणे नुकसान भरपाई विहित मुदतीत देण्यात यावी ही विनंती.

बॅक पासबुक प्रत/ खाते तपशील सोबत जोडले आहे.
मोबाइल नंबर -------------------------------------
ठिकाण      -----------------

सोबतजोडलेलीकागंदपत्रे:

१) नुकसानीचा तपशील

२) संबंधित७/१२
२) ना हरकत प्रमाणपत्र (७/१२अनेकांचेनावेअसल्यास)                अर्जदाराची सही
३) बॅक पासबुक प्रत/ बँक शाखा व खाते क्रमांक                दिनांक

शेत नुकसानाचा तपशील

सर्व्हे क्रमांक

शेताची चतु:सीमा :-
पूर्वेस------------------------
पश्चिमेस---------------------
उत्तरेस------------------------
दक्षिणेस------------------

नुकसानीचा तपशील

| क्रमांक | पीक/ झाडे | प्राणी | प्रमाण/संख्या<br>चौरस मिटर/ गुंठे/ रोपे/ झाडे/ फळे | त्यापासून अपेक्षित उत्पादन | बाजारभाव | बुडालेले अपेक्षित उत्पन्न (एकूण) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

मी स्वतः हा तपशील बारकाईने नोंदला आहे व पंचनाम्याचे वेळेस ते दाखवून देण्याची तयारी आहे. पंचनाम्याची तारीख व वेळ या मोबाईल वर मेसेज तथा फोन द्वारे कळवावी ही विनंती.

(स्वाक्षरी)

# प्रथम अपील अ २

नाव-
पत्ता-
दिनांक-

प्रति,
माननीय महोदय,

मी दिनांक / /२० रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी, यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या------------------पिकाचे माझ्या अंदाजानुसार---------------- रू. चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. झालेल्या नुकसानीचा संपूर्ण तपशील व त्यावरून काढलेला अंदाज सोबत जोडला होता.

या अर्जावर एक महिना पूर्ण होऊनही कोणतीही अधिकृत कार्यवाही झालेली नाही. शासन परिपत्रक क्रमांक :- डब्ल्यूएलपी-2016/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार अर्ज केल्यापासून १४ दिवसांचे आत तीनसदस्यांच्या अधिकृत समितीकडून मोका पंचनामा होणे अनिवार्य आहे. परंतु शासकीय नियमांना अनुसरून पंचनामा झालेला नाही.

वन्य प्राण्यांनी नुकसान केल्याचे पुरावे वेगाने नाहीसे होतात आणि उशिरा पंचनामा केल्यास ते दृष्टीस पडत नाहीत. विहित मुदतीत पंचनामा न झाल्या कारणाने आता माझा मूळ अर्जातील नुकसानीचा अंदाज सत्य मानून त्याप्रमाणे संपूर्ण नुकसान भरपाई देणे अनिवार्य आहे. पंचनाम्याची मुदत उलटून गेल्यावर पुरावे दिसत नाहीत या कारणाने माझा दावा नाकारण्याचे अधिकार वन खात्यास नाहीत. वन खात्याकडून विलंब झाल्यास त्याची शिक्षा शेतकऱ्यास देणे न्यायास धरून नाही.

तरी माझ्या मूळ अर्जात व्यक्त केलेला नुकसानीचा तपशील व अंदाज सत्य मानून मला -------------- रू. ही नुकसान भरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतील व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नावः
सोबत: मूळ अर्जाची प्रत व पोच

# द्वितीय अपील - अ २

नाव
पत्ता-
दिनांक-
प्रति,

माननीय महोदय,

मीदिनांक --------- रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी, यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या _____ पिकाचे माझ्या अंदाजानुसार रू.---------- चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. त्यावर योग्य ती कारवाई न झाल्यामुळे दिनांक / /२० रोजी मा. उपवनसंरक्षक यांचेकडे प्रथम अपील केले. यावरही आजतागायत योग्य कार्यवाही न झाल्यामुळे हे द्वितीय अपील करत आहे.

शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्यूएलपी-2016॥/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार अर्ज केल्यापासून१४ दिवसांचे आत तीन सदस्यांच्या अधिकृत समितीकडून मोका पंचनामा होणे अनिवार्य आहे. शासकीय नियमांना अनुसरून विहित मुदतीत पंचनामा न झाल्या कारणाने आता माझा मूळ अर्जातील नुकसानीचा तपशील व अंदाज सत्य मानून त्याप्रमाणे संपूर्ण नुकसान भरपाई देणे अनिवार्य आहे.

माझ्या मूळ अर्जात काही त्रुटी असतील अथवा इतर कोणत्याही कारणास्तव माझा नुकसान भरपाई अर्ज नाकारायचा असल्यास तसे मला विहित मुदतीत लेखी कळवणे अपेक्षित होते. तसे न कळविल्याने आता कोणत्याही कारणास्तव माझा अर्ज नाकारता येणार नाही. वन खात्याकडून विलंब झाल्यास त्याची शिक्षा शेतकऱ्यास देणे न्यायास धरून नाही.

तरी माझ्या मूळ अर्जात व्यक्त केलेला नुकसानीचा अंदाज सत्य मानून मला रू.----------ही नुकसानभरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतील व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नावः

# प्रथम अपील – अ 3

नाव
पत्ता
दिनांक:

प्रति,
(तुमच्या भागातील कार्यालय पत्ता)

माननीय महोदय,

मीदिनांक / /रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या-------------पिकाचे माझ्या अंदाजानुसार रू. ----------- चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता.  आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली होती.

या अर्जादाखल दिनांक | /२० रोजी नियमाप्रमाणे पंचनामा करण्यात आला. पंचनाम्याची प्रत मलादेण्यात आली/आली नाही. शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्यूएलपी-2016/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार घटनेपासून २६ दिवसांत नुकसान भरपाईचे पैसे जमा होणे अपेक्षित आहे. हे मला अद्याप प्राप्त झालेले नाहीत.

मला सदर नुकसान भरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतीलं व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नाव

सोबत जोडले आहे: मूळ अर्ज व नुकसानीचा तपशील

# द्वितीय अपील - अ 3

नाव
पत्ता
दिनांक

प्रति,
(तुमच्या भागातील कार्यालय पत्ता)

माननीय महोदय,
मी दिनांक / /20 रोजी मा. परिक्षेत्र वनाधिकारी , यांचेकडे वन्य प्राण्यांकडून माझ्या ----------पिकाचे माझ्या अंदाजानुसार रू.----------- चे नुकसान झाले असून त्याची भरपाई मागणारा अर्ज केला होता. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडली होती.

शासन परिपत्रक क्रमांक:- डब्ल्यूएलपी-2016/प्र.क्र.290/फ-1, २८/११/२०१६ नुसार घटने पासून २६ दिवसांत नुकसान भरपाचे पैसे जमा होणे अपेक्षित आहे. हे मला अद्याप प्राप्त झालेले नाहीत. विहित मुदतीत नुकसान भरपाईचे पैसे जमा न झाल्याने दिनांक / /२० रोजी मा. उपवनसंरक्षक यांचेकडे प्रथम अपील केले. यावरही आजतागायत योग्य कार्यवाही न झाल्यामुळे हे द्वितीय अपील करत आहे.

वन खात्याकडून विलंब झाल्यास त्याची शिक्षा शेतकऱ्यास देणे न्यायास धरून नाही. तरी माझ्या मूळअर्जात व्यक्त केलेली रू.-------- ही नुकसान भरपाई त्यावरील विलंबाच्या मुदतीतील व्याजासहित त्वरित देण्यात यावी ही विनंती.

आपला नम्र,

नाव

सोबत जोडले कागदपत्र : मूळ अर्ज व प्रथम अपीलाच्या प्रती

**सेवा हक्क आयोगास अपील**

**(कोणत्याही कारणास्तव केलेल्या प्रथम वा द्वितीय अपिलावर कार्यवाही न झाल्यास)**

मा. सेवा हक्क आयुक्त

...................

.............

विषय,

वन्य प्राण्यांकडून झालेल्या पीक नुकसानीच्या भरपाई अर्जावर योग्य कारवाई विहित मुदतीत न होणे.

माननीय महोदय,

मी अर्जदार नांव,

गाव .................................. तालुका ............. माझे शेत सर्व्हे क्रमांक ..................
येथे दिनांक / /२० रोजी वन्य प्राण्यांकडून झालेल्या पीक नुकसानीच्या भरपाई साठी अर्ज केला होता. त्यावर योग्य तो कार्यवाही ना झाल्यामुळे दि. / /२० रोजी प्रथम आणि दि. / /२० रोजी दुसते अपील दाखल केले. त्यावरही उचित कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे दाद मागत आहे.

वन्य प्राण्यांकडून झालेल्या पीक नुकसानीची भरपाई सेवा हक्क आयोगाच्या कक्षेत येत असून या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून मला न्याय मिळवून द्यावा ही विनंती.

प्रकरणाचा सर्व तपशील, मूळ अर्ज आणि दोन्ही अपिलांच्या प्रती जोडल्या आहेत.

आपला नम्र,

RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक १६(३)] गुरुवार, फेब्रुवारी १, २०२४/माघ १२, शके १९४५ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जानेवारी, २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३.**

क्रमांक डब्ल्यूएलपी ०२.२३/प्र.क्र.५२(भाग-३)/फ-१.—महाराष्ट्र वन्य प्राण्यांमुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरिता नुकसानभरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ (२०२३ चा महा.३७) यांच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, वन्य प्राण्यांमुळे, मानव व पशू यांची जीवितहानी किंवा त्यांना इजा पोहोचवणे अथवा पिकांचे, फळझाडांचे किंवा मालमत्तेचे नुकसान होणे यांकरिता उक्त अधिनियमान्वये प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचे दर, याद्वारे, पुढीलप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यात येत आहेत :—

१. वाघ, बिबट्या, अस्वल, रानगवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, जंगली कुत्रा, हरिण, नीलगाय, माकड किंवा वानर यांच्या हल्ल्यामुळे झालेली मानवी जीवितहानी किंवा मानवाला झालेली कोणतीही इजा याकरिता प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर पुढीलप्रमाणे असेल :-

तक्ता

| अ. क्र. (१) | इजेचा प्रकार (२) | नुकसानभरपाईचा दर (३) |
|---|---|---|
| (१) | मानवी जीवितहानी. | रुपये पंचवीस लाख. |
| (२) | मानवास आलेले कायमस्वरूपी दिव्यांगत्व. | रुपये सात लाख पन्नास हजार. |
| (३) | मानवाला झालेली गंभीर इजा. | रुपये पाच लाख. |
| (४) | मानवाला झालेली किरकोळ इजा. | खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आल्यास, उपचाराचा खर्च किंवा फक्त पन्नास हजार रुपये, यांपैकी जी कमी असेल तितकी. |

२. वाघ, बिबट्या, अस्वल, रानगवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती किंवा जंगली कुत्रा यांच्या हल्ल्यामुळे झालेली पशू जीवांची हानी किंवा त्यांना पोहचलेली इजा यांकरिता प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर पुढीलप्रमाणे असेल :-

तक्ता

| अ. क्र. (१) | पशुधनाचा प्रकार (पाळीव प्राणी) (२) | नुकसानभरपाईचा दर (३) |
|---|---|---|
| (१) | गाय, म्हैस किंवा बैल यांची जीवित हानी. | पशुंच्या बाजार किंमतीच्या पंच्याहत्तर टक्के किंवा फक्त सत्तर हजार रुपये, यांपैकी जी कमी असेल तितकी. |
| (२) | मेंढ्यांची, शेळ्यांची किंवा वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५३) याच्या कलम २ च्या खंड (१८क) मध्ये व्याख्या केलेल्या इतर पशुधनाची जीवित हानी. | पशुंच्या बाजार किंमतीच्या पंच्याहत्तर टक्के किंवा फक्त पंधरा हजार रुपये, यांपैकी जी कमी असेल तितकी. |
| (३) | गाय, म्हैस किंवा बैल यांना कायमस्वरूपी आलेली विकलांगता. | पशुंच्या बाजार किंमतीच्या पन्नास टक्के किंवा फक्त पंधरा हजार रुपये, यांपैकी जी कमी असेल तितकी. |
| (४) | गाय, म्हैस, बैल, मेंढी, शेळी किंवा इतर पशुधनास झालेली इजा. | जखमी झालेल्या पशुच्या उपचारासाठी केलेला वैद्यकीय खर्च प्रदान करण्यात येईल. जखमी पशुचा उपचार, शासकीय किंवा जिल्हा परिषदेच्या पशुचिकित्सालयात करण्यात येईल. प्रदेय असलेली रक्कम, पशुच्या बाजार किंमतीच्या पंचवीस टक्के, किंवा फक्त पाच हजार रुपये, यांपैकी जी कमी असेल तितकी, या मर्यादेत असेल. |

३. रानडुक्कर, हरिण, रानगवा, नीलगाय, माकड, वानर किंवा हत्ती यांच्या हल्ल्यामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीकरिता प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर, पुढीलप्रमाणे असेल :-

तक्ता

| अ. क्र. (१) | नुकसानीचा तपशील. (२) | नुकसानभरपाईचा दर. (३) |
|---|---|---|
| (१) | शेतपिकाचे नुकसान रु.२०,००० पर्यंत झाल्यास | पूर्ण किंमत परंतु किमान रु. २,००० |
| (२) | शेतपिकाचे नुकसान रु.२०,००० पेक्षा जास्त झाल्यास | रु.२०,००० अधिक रु.२०,००० चे वरील नुकसानीचे ८०% रक्कम (रु.५०,००० चे कमाल मर्यादेत) |
| (३) | ऊस पिकाचे नुकसान | रु.१,६०० प्रती मे.टन प्रमाणे (रु.५०,००० चे मर्यादेत) |

४. रानडुक्कर, हरिण, रानगवा, नीलगाय, माकड, वानर किंवा हत्ती यांच्या हल्ल्यामुळे फळ झाडांच्या झालेल्या नुकसानीकरिता प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर, पुढीलप्रमाणे असेल :-

तक्ता

| अ. क्र. (१) | झाडाची जात व वय (२) | प्रति झाड नुकसानभरपाईचा दर. (३) |
|---|---|---|
| (१) | नारळाचे झाड,- (एक) एक वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाचशे. |
| | (दोन) एक वर्षावरील व दोन वर्षापर्यंत, | फक्त रुपये एक हजार. |
| | (तीन) दोन वर्षावरील व तीन वर्षापर्यंत, | फक्त रुपये तीन हजार. |
| | (चार) तीन वर्षावरील व चार वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाच हजार. |
| | (पाच) चार वर्षावरील व पाच वर्षापर्यंत, | फक्त रुपये सात हजार पाचशे. |
| | (सहा) पाच वर्षावरील. | फक्त रुपये नऊ हजार पाचशे. |
| (२) | नागवेल,- (एक) एक वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाचशे. |
| | (दोन) एक वर्षावरील व दोन वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाचशे. |
| | (तीन) दोन वर्षावरील व तीन वर्षापर्यंत, | फक्त रुपये दोन हजार. |
| | (चार) तीन वर्षावरील व चार वर्षापर्यंत, | फक्त रुपये दोन हजार पाचशे. |
| | (पाच) चार वर्षावरील व पाच वर्षापर्यंत, | फक्त रुपये तीन हजार पाचशे. |
| | (सहा) पाच वर्षावरील. | फक्त रुपये पाच हजार पाचशे. |
| (३) | केळीचे झाड,- | प्रति रोपटे फक्त रुपये दोनशे चाळीस. |
| (४) | कलम केलेले आंब्याचे झाड,- (एक) एक वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाचशे. |
| | (दोन) एक वर्षावरील व दोन वर्षापर्यंत, | फक्त रुपये एक हजार पाचशे. |
| | (तीन) दोन वर्षावरील व तीन वर्षापर्यंत, | फक्त रुपये तीन हजार. |
| | (चार) तीन वर्षावरील व चार वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाच हजार. |
| | (पाच) चार वर्षावरील व पाच वर्षापर्यंत, | फक्त रुपये सहा हजार. |

| | | |
|---|---|---|
| | (सहा) पाच वर्षांवरील. | फक्त रुपये सात हजार. |
| (५) | संत्री व मोसंबी,- | |
| | (एक) एक वर्षापर्यंत, | फक्त रुपये पाचशे. |
| | (दोन) एक वर्षावरील व दोन वर्षांपर्यंत, | फक्त रुपये एक हजार. |
| | (तीन) दोन वर्षांवरील व तीन वर्षांपर्यंत, | फक्त रुपये दोन हजार पाचशे. |
| | (चार) तीन वर्षांवरील व चार वर्षांपर्यंत, | फक्त रुपये तीन हजार. |
| | (पाच) चार वर्षांवरील व पाच वर्षांपर्यंत, | फक्त रुपये तीन हजार पाचशे. |
| | (सहा) पाच वर्षांवरील. | फक्त रुपये चार हजार पाचशे. |
| (६) | इतर फळ झाडे,- | |
| | (एक) एक वर्षापर्यंत, | फक्त रुपये दोनशे. |
| | (दोन) एक वर्षावरील व दोन वर्षांपर्यंत, | फक्त रुपये तीनशे. |
| | (तीन) दोन वर्षांवरील व तीन वर्षांपर्यंत, | फक्त रुपये पाचशे. |
| | (चार) तीन वर्षांवरील व चार वर्षांपर्यंत, | फक्त रुपये सहाशे. |
| | (पाच) चार वर्षांवरील व पाच वर्षांपर्यंत, | फक्त रुपये सातशे. |
| | (सहा) पाच वर्षांवरील. | फक्त रुपये एक हजार. |

५. गिधाडांच्या हल्ल्यामुळे झालेल्या नारळाच्या नुकसानीकरिता प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर पुढीलप्रमाणे असेल :-

**तक्ता**

| अ. क्र.<br>(१) | फळाचे नाव<br>(२) | नुकसानभरपाईचा दर<br>(३) |
|---|---|---|
| (१) | नारळ. | प्रति झाड, प्रति वर्ष, चारशे रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, प्रत्येक नारळासाठी सात रुपये.<br>नुकसानभरपाई देण्यासाठी नारळाची संख्या, मागील वर्षातील प्रत्येक झाडाच्या उत्पादकतेतील फरक आणि गिधाडांनी जेथे घरटे बनवले असेल त्या झाडाच्या, गिधाडांच्या विष्ठेमुळे झालेल्या नुकसानीनंतरचे प्रत्यक्ष उत्पन्न या आधारे निर्धारित करण्यात येईल. |

६. (१) जंगली हत्तींच्या हल्ल्यामुळे शेतीची अवजारे किंवा इतर मालमत्तेचे नुकसान झाल्यास, प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर, पुढीलप्रमाणे असेल :-

**तक्ता**

| अ. क्र.<br>(१) | मालमत्तेचा तपशील<br>(२) | नुकसानभरपाईचा दर.<br>(३) |
|---|---|---|
| (१) | शेतीची यंत्रे व साधनसामग्री. | नुकसानीची रक्कम किंवा फक्त पाच हजार रुपये, यांपैकी, जी कमी असेल तितकी. |
| (२) | बैलगाडी. | नुकसानीची रक्कम किंवा फक्त पाच हजार रुपये, यांपैकी, जी कमी असेल तितकी. |
| (३) | संरक्षक भिंत व कुंपण. | नुकसानीची रक्कम किंवा फक्त दहा हजार रुपये, यांपैकी, जी कमी असेल तितकी. |

(२) जंगली हत्तींच्या हल्ल्यामुळे इमारतीचे किंवा घराचे नुकसान झाल्यास, प्रदेय असलेल्या नुकसानभरपाईचा दर, पुढीलप्रमाणे असेल :-

**तक्ता**

| अ. क्र. (१) | इमारत किंवा घराचा तपशील (२) | नुकसानभरपाईचा दर (३) |
|---|---|---|
| (१) | कौलांचे किंवा धातूच्या पत्र्यांचे अथवा सिमेंट व लोखंडी छताचे बनविलेले घर किंवा गोठा. | नुकसानीची रक्कम किंवा फक्त पन्नास हजार रुपये, यांपैकी, जी कमी असेल तितकी. |
| (२) | वीट किंवा सिमेंटचा स्लॅब असलेली इमारत. | नुकसानीची रक्कम किंवा शासनाने घराकरिता मंजूर केलेली रक्कम, यांपैकी, जी कमी असेल तितकी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विवेक होशिंग,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 30th January, 2024.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PAYMENT OF COMPENSATION FOR LOSS, INJURY OR DAMAGE CAUSED BY WILD ANIMALS ACT, 2023.

No. WLP-02.23/CR-52(Part-III)/F-1.– In exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 3 of the Maharashtra Payment of Compensation for Loss, Injury or Damage Caused by Wild Animals Act, 2023 (Mah. XXXVII of 2023), the Government of Maharashtra hereby specifies the rates of compensation payable under the said Act for the loss of human life or injuries to humans and cattle or damage to crops, fruit plants and property caused due to attack of wild animal as follows, namely :–

1. The rate of compensation payable for loss of human life or any injury to human caused due to attack of tiger, leopard, bear, bison, wild pig, jackal, hyena, fox, crocodile, elephant, wild dog, deer, nilgai, monkey or langur, shall be as follows :–

**Table**

| **Sr. Nos.**<br>**(1)** | **Type of injury**<br>**(2)** | **Rate of compensation**<br>**(3)** |
|---|---|---|
| (1) | Loss of human life. | Rupees twenty five lakhs. |
| (2) | Permanent Disability to human. | Rupees seven lakh and fifty thousand. |
| (3) | Major injury to human. | Rupees five lakhs. |
| (4) | Minor injury to human. | In case treatment is done in private hospital the cost of treatment or rupees fifty thousand only, whichever is less. |

2. The rate of compensation payable for loss or injury to the cattle caused due to attack of tiger, leopard, bear, bison, wild pig, jackal, hyena, fox, crocodile, elephant or wild dogs shall be as follows :–

**Table**

| **Sr. Nos.**<br>**(1)** | **Type of Livestock (Domestic Animal)**<br>**(2)** | **Rate of compensation**<br>**(3)** |
|---|---|---|
| (1) | Loss of cow, buffalo or bullock. | Seventy five per cent. of market price of cattle or rupees seventy thousand only, whichever is less. |
| (2) | Loss of sheep, goats and other livestock defined in clause (*18A*) of section 2 of the Wild Life (Protection) Act, 1972 (53 of 1972) . | Seventy five per cent. of market price of cattle or rupees fifteen thousand only, whichever is less. |
| (3) | Permanent disability to cow, buffalo or bullock. | Fifty per cent. of market price of cattle or rupees fifteen thousand only, whichever is less. |
| (4) | Injury to cow, buffalo, bullock, sheep, goat or other livestock. | Medical expenses incurred for treatment of injured cattle shall be paid. Treatment of injured cattle shall be taken in Government or *Zilla Parishad* veterinary hospital. Amount payable shall be limited to twenty five per cent. of the market price of cattle or rupees five thousand only, whichever is less. |

3. The rate of compensation payable for damage to crops caused due to attack of wild pig, deer, bison, nilgai, monkey, langur or elephant, shall be as follows :–

**Table**

| Sr. Nos. (1) | Details of damages (2) | Rate of compensation (3) |
|---|---|---|
| (1) | Crop damage upto rupees twenty thousand in each case. | Full cost of damage, but not less than rupees two thousand only. |
| (2) | Crop damage exceeding rupees twenty thousand in each case. | Rupees twenty thousand plus eighty per cent. of the amount above rupees twenty thousand, subject to maximum limit of rupees fifty thousand only. |
| (3) | Damage to sugarcane crop in each case. | Rupees sixteen hundred per metric ton, subject to a maximum limit of rupees fifty thousand only. |

4. The rate of compensation payable for damage to fruit trees caused due to attack of wild pig, deer, bison, nilgai, monkey, langur or elephant, shall be as follows :–

**Table**

| Sr. Nos. (1) | Species and age of tree. (2) | Rate of compensation per tree. (3) |
|---|---|---|
| (1) | Coconut tree,-<br>(i) upto one year, | Rupees five hundred only. |
| | (ii) above one year and upto two years, | Rupees one thousand only. |
| | (iii) above two years and upto three years, | Rupees three thousand only. |
| | (iv) above three years and upto four years, | Rupees five thousand only. |
| | (v) above four years and upto five years, | Rupees seven thousand and five hundred only. |
| | (vi) above five years. | Rupees nine thousand and five hundred only. |
| (2) | Betel vine,-<br>(i) upto one year, | Rupees five hundred only. |
| | (ii) above one year and upto two years, | Rupees five hundred only. |
| | (iii) above two years and upto three years, | Rupees two thousand only. |
| | (iv) above three years and upto four years, | Rupees two thousand and five hundred only. |
| | (v) above four years and upto five years, | Rupees three thousand and five hundred only. |
| | (vi) above five years. | Rupees five thousand and five hundred only. |
| (3) | Banana plant. | Rupees two hundred and forty only per plant. |

| | | |
|---|---|---|
| (4) | Grafted Mango tree,-<br>(i) upto one year, | Rupees five hundred only. |
| | (ii) above one year and upto two years, | Rupees one thousand and five hundred only. |
| | (iii) above two years and upto three years, | Rupees three thousand only. |
| | (iv) above three years and upto four years, | Rupees five thousand only. |
| | (v) above four years and upto five years, | Rupees six thousand only. |
| | (vi) above five years. | Rupees seven thousand only. |
| (5) | Orange and sweet lime,-<br>(i) upto one year, | Rupees five hundred only. |
| | (ii) above one year and upto two years, | Rupees one thousand only. |
| | (iii) above two years and upto three years, | Rupees two thousand and five hundred only. |
| | (iv) above three years and upto four years, | Rupees three thousand only. |
| | (v) above four years and upto five years, | Rupees three thousand and five hundred only. |
| | (vi) above five years. | Rupees four thousand and five hundred only. |
| (6) | Other fruit trees,-<br>(i) upto one year, | Rupees two hundred only. |
| | (ii) above one year and upto two years, | Rupees three hundred only. |
| | (iii) above two years and upto three years, | Rupees five hundred only. |
| | (iv) above three years and upto four years, | Rupees six hundred only. |
| | (v) above four years and upto five years, | Rupees seven hundred only. |
| | (vi) above five years. | Rupees one thousand only. |

5. The rate of compensation payable for damage of coconuts caused due to attack of vultures shall be as follows :–

**Table**

| **Sr. Nos.** **(1)** | **Name of fruit** **(2)** | **Rate of compensation** **(3)** |
|---|---|---|
| (1) | Coconut fruit. | Rupees seven per coconut, subject to maximum of rupees four hundred per tree per year.<br>The number of coconut for awarding compensation shall be determined based on the difference of per tree productivity in the last year and actual yield after damage by vulture droppings for the tree where the vulture has made his nest. |

6. (1) In case of damage to the farm equipment or other property caused due to attack of wild elephants, the rate of compensation payable shall be as follows :–

**Table**

| Sr. Nos. (1) | Particulars of property (2) | Rate of compensation (3) |
|---|---|---|
| (1) | Farm machinery and equipment. | Amount of damage or rupees five thousand only, whichever is less. |
| (2) | Bullock cart. | Amount of damage or rupees five thousand only, whichever is less. |
| (3) | Protective wall and fencing. | Amount of damage or rupees ten thousand only, whichever is less. |

(2) In case of damage to the building or house caused due to attack of wild elephants, the rate of compensation payable shall be as follows :–

**Table**

| Sr. Nos. (1) | Particulars of building or house (2) | Rate of compensation (3) |
|---|---|---|
| (1) | House made of tiles or metal sheet or cement sheet roof or cattle shed. | Amount of damage or rupees fifty thousand only, whichever is less. |
| (2) | Brick or cement slab building. | Amount of damage or amount sanctioned by the Government for housing or rupees one lakh, whichever is less. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIVEK HOSHING,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

**वन्यप्राण्यांमुळे मानवहानी प्रकरणी अर्थसहाय्य देणे तसेच पशुधन व पिकहानीबाबत नुकसान भरपाई देण्याबाबत शासन आदेशांचे संकलन.**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः- डब्ल्यूएलपी-२०१६/प्र.क्र.२९०/फ-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः- २८ .११.२०१६.

<u>प्रस्तावना-</u>

वाघ, बिबट, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती मृत किंवा जखमी झाल्यास संबंधितांना अर्थ सहाय्य देण्याबाबत तसेच गाय, बैल, म्हैस, बकरी, मेंढी किंवा इतर पशुधनाचा मृत्यू झाल्यास किंवा ते जखमी झाल्यास जनावर मालकास नुकसान भरपाई देण्यासंबंधी विस्तृत दिशानिर्देश वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयांन्वये देण्यात आले आहेत. शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१०९४/प्र.क्र.११५/फ-१, दिनांक २३.०८.२००४ अन्वये वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसान झाल्यास संबंधितांना नुकसान भरपाई देण्याबाबतची प्रथमतः तरतूद करण्यात आली. राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाने वेळोवेळी केलेल्या शिफारशी तसेच वन्यजीव संरक्षण, व्यापक जनहित व इतर आनुषंगिक बाबींचा विचार करुन परिस्थितीनुसार वेळोवेळी अर्थसहाय्य व नुकसान भरपाई दर व कार्यपध्दतीबाबत विविध शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि, उपरोल्लेखित कार्यपध्दती, अर्थसहाय्य व नुकसान भरपाईचे दरांमध्ये होणारा बदल इत्यादीबाबतचा तपशील वेगवेगळया शासन निर्णयात असल्यामुळे त्यातील निर्देशांची अंमलबजावणी करण्यास क्षेत्रीय पातळीवर अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. उक्त व्यवहारिक अडचणींमुळे उक्त शासन धोरणांचा लाभ जनसामान्यास वेळीच मिळत नसल्याची बाबही शासनाच्या निदर्शनास आली आहे. या सर्व बाबींवर विचार करता, वन्यप्राण्यांमुळे होणा-या नुकसानी संदर्भात अर्थसहाय्य व नुकसान भरपाईबाबत आवश्यक कार्यपध्दती तसेच या संदर्भातील दरांबाबत सर्वसमावेशक परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे पुढील परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

<u>परिपत्रक -</u>

## अ- वन्यप्राण्यांमुळे मानवहानी प्रकरणी अर्थसहाय्य.

१. वाघ, बिबट, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती मृत किंवा जखमी झाल्यास [**शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१००८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक** ०२.०७.२०१० (दिनांक ०२.०७.२०१० पासून अर्थसहाय्य लागू.)]

| क्रमांक (१) | तपशील (२) | देय अर्थसहाय्याची रक्कम (३) |
|---|---|---|
| १ | व्यक्ती मृत झाल्यास किंवा कायमचे अपंग झाल्यास | रु. २,००,०००/- (रु.दोन लाख फक्त) |
| २ | व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास | जखमी झालेल्या व्यक्तीस रु. ५०,०००/- (रु.पन्नास हजार फक्त) |
| ३ | व्यक्ती किरकोळ जखमी झाल्यास | औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात यावा. मात्र खाजगी रुग्णालयात औषधोपचार करणे अगत्याचे असल्यास त्याची मर्यादा रु. ७,५००/- (रु.सात हजार पाचशे फक्त) प्रती व्यक्ती अशी राहील. शक्यतो औषधोपचार शासकीय/ जिल्हा परिषद रुग्णालयात करावा. |

सदर अर्थ सहाय्य खालील अटी व शर्तीला अनुसरुन अनुज्ञेय राहील.

१.१.वन्यप्राण्यांकडून झालेला हल्ला हा सदर व्यक्तीने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ च्या तरतूदींचा भंग करतांना झालेला नसावा.

१.२.हल्ला झालेल्या व्यक्तीने अथवा त्यांच्या नातेवाईक/ मित्रांनी हल्ला झाल्यापासून ४८ तासांच्या आत नजिकच्या वन अधिका-याला/ कर्मचा-याला कळवावे.

१.३.हल्ला झाल्यापासून तीन दिवसांच्या आत स्थानिक पोलीस अधिकारी अथवा वनाधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन झालेल्या हल्ल्याचा पंचनामा करावा. पंचनामा करणारा अधिकारी पोलीस उपनिरीक्षक वा वनक्षेत्रपाल यांच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

१.४.वन्यप्राण्यांकडून झालेल्या हल्ल्यामुळे सदर व्यक्ती मृत अथवा जखमी झाली हे तपासण्याकरिता देण्यात येणारे वैद्यकीय प्रमाणपत्र सक्षम राजपत्रित वैद्यकीय अधिकारी, जो शासकीय रुग्णालयाचा प्रमुख आहे व ज्याचा दर्जा वैद्यकीय अधिका-याच्या (मेडीकल ऑफिसर) खालचा नाही असा अधिकारी प्रमाणपत्र देण्यास सक्षम अधिकारी मानला जावा.

१.५.वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे मृत झालेल्या व्यक्तीला द्यावयाचे आर्थिक सहाय्य त्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसालाच (Legal Heirs) देण्यात यावे.

१.६.वन्यप्राण्याच्या हल्ल्यामुळे जखमी झालेल्या व्यक्तीला देण्यात येणारी आर्थिक सहाय्याची रक्कम खुद्द जखमी व्यक्तीलाच देण्यात यावी.

१.७.जखमी झालेल्या अथवा मृत झालेल्या व्यक्तींना देण्यात येणारी आर्थिक सहाय्याची रक्कम मंजूर करणारा अधिकारी उप वनसंरक्षक/ विभागीय वन अधिकारी या वनाधिका-याच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

१.८.अर्थ सहाय्याची रक्कम केवळ रेखांकित धनादेशाव्दारे अदा करण्यात यावी.

२. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१, दिनांक ३०.०३.२०१३** अन्वये उपरोल्लेखित दिनांक ०२.०७.२०१० च्या शासन निर्णयान्वये निर्धारित मनुष्यहानीसाठीच्या दरांमध्ये वाढ करुन खालीलप्रमाणे सुधारित दर निर्धारित करण्यात आले (दिनांक ३०.०३.२०१३ पासून लागू).

| क्रमांक (१) | तपशील (२) | देय अर्थसहाय्याची रक्कम (३) |
|---|---|---|
| १ | व्यक्ती मृत झाल्यास | रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख फक्त) |
| २ | व्यक्ती कायम अपंग झाल्यास | रुपये ४,००,०००/- (रुपये चार लाख फक्त) |
| ३ | व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास | रुपये १,००,०००/- (रुपये एक लाख फक्त) |

उपरोक्त शासन निर्णयातील व्यक्ती कायम अपंग झाल्याचे प्रकरणी कायम अपंगत्वाचा दाखला जिल्हा शल्य चिकित्सकाकडून प्राप्त करण्याची अट अंतर्भूत करण्यात आली, इतर अटी पूर्ववत राहिल्या.

३. उपरोक्त शासन निर्णयामध्ये व्यक्ती मृत झाल्याचे प्रकरणी अर्थ सहाय्य देण्यासाठी दिवाणी न्यायालयामधून वारसा प्रमाणपत्र काढणे अनिवार्य होते. तथापि, त्यासाठी बराच वेळ लागतो व वेळेवर अर्थ सहाय्य मिळत नसल्यामुळे जनसामान्यांमध्ये असंतोष निर्माण होतो, असे निदर्शनास आल्यावर **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१, दिनांक २९.०५.२०१३** अन्वये शासनाने पुढील निर्देश दिले.

३.१. वाघ, बिबट, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती मृत झाल्यावर खाली नमूद केल्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

३.२. वन्य प्राणी हल्ल्यामध्ये मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसांना अनुदान / अर्थसहाय्य देण्याबाबतचे निकष खालीलप्रमाणे ठरवले जातील.

३.२.१. **पुरुष प्रौढ व्यक्ती मृत असल्यास -**

(अ) त्याची पत्नी जिवंत असल्यास, पत्नी आणि अज्ञान मुलांना सम प्रमाणात मदत द्यावी

(ब) पत्नी जिवंत नसल्यास सर्व जिवंत अपत्यांना सम प्रमाणात मदत देण्यात यावी.

(क) जर काही अपत्ये अज्ञान असतील, तर त्यांचे हिस्से ती अज्ञान अपत्ये व अतिरिक्त जिल्हाधिकारी (नियमित) यांचे संयुक्त नावे ठेवण्यात यावे.

(ड) जर पत्नी आणि अपत्ये जिवंत नसतील तर मृत व्यक्तीच्या आई-वडिल किंवा त्यांच्यापैकी जो जिवंत असेल त्याला मदत देण्यात यावी.

३.२.२. **जर प्रौढ स्त्री मृत पावली असल्यास -**

(अ) पती जिवंत असल्यास पती आणि अज्ञान मुलांना सम प्रमाणात मदत द्यावी.

(ब) पती जिवंत नसल्यास सर्व जिवंत अपत्यास सम प्रमाणात मदत देण्यात यावी.

(क) जर काही जिवंत अपत्य अज्ञान असतील तर त्यांचे हिस्से ती अज्ञान अपत्ये व अतिरिक्त जिल्हाधिकारी (नियमीत) यांचे संयुक्त नावे ठेवण्यात यावे.

(ड) जर पती आणि अपत्ये जिवंत नसतील तर मृत व्यक्तीच्या आई-वडिल किंवा त्यांच्यापैकी जो जिवंत असेल त्याला मदत देण्यात यावी.

३.२.३. **० ते १८ वर्ष वयोगटातील व्यक्ती मृत पावली असल्यास** -

(अ) त्याच्या आई-वडिलांना किंवा त्यापैकी, जो जिवंत असेल त्याला मदत देण्यात यावी.

(ब) आई-वडील जर जिवंत नसतील तर मृत व्यक्तीच्या भाऊ व बहिणीस समप्रमाणात मदत देण्यात यावी.

३.२.४. **(अ)** वर नमूद केलेल्या व्यतिरिक्त उर्वरीत सर्व प्रकरणामध्ये सक्सेशन सर्टिफिकेट मागवूनच त्याप्रमाणे मदत देण्यात यावी.

(ब) तसेच वन नमूद केलेल्या किंवा इतर कोणत्याही प्रकरणात आक्षेप घेतला असल्यास संबंधित व्यक्तीस सक्सेशन सर्टिफिकेट सादर करण्यास सांगूनच मदत देण्यात यावी.

३.२.५. दिनांक ३० मार्च, २०१३ च्या शासन निर्णयान्वये व्यक्ती मृत झाल्यास, शासन निर्णयामधील तरतुदीनुसार रुपये ५ लाख अर्थसहाय्याची रक्कम संबंधितांना अदा करण्यात येते. या रक्कमेपैकी रुपये १ लाख अर्थसहाय्य म्हणून देण्यात येतील आणि उर्वरित रुपये ४ लाख उपरोक्त क्रमांक ४.२.१, ४.२.२ आणि ४.२.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे देय असलेल्या व्यक्तींच्या नांवे त्यांच्या राष्ट्रीयकृत बॅन्केत असलेल्या दरमहा व्याज देणा-या संयुक्त खात्यामध्ये ठेव रक्कम (फिक्स डिपॉझीट) जमा करण्यात यावी. त्या ठेव रक्कमेवर दरमहा येणारे व्याज त्या कुटुंबास उपलब्ध होईल.

३.२.६. संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांनी उपरोक्त नमूदप्रमाणे कार्यवाही करतांना महसूल मंडळ अधिकारी यांचेकडून मृत व्यक्तीच्या कुटुंबाबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करावे व संबंधितांकडून मृत व्यक्तीचे वारस असल्याबाबतचे शपथपत्र घ्यावे. जर आदिवासी व दुर्गम भागात शपथपत्र करणे शक्य नसेल तर त्या परिस्थितीत संबंधित नायब तहसिलदार मृत व्यक्तीचे वारसाबाबत यांचेकडून प्रमाणपत्र प्राप्त करुन अर्थसहाय्य देण्याची कार्यवाही करावी.

३.२.७. वन्यप्राण्यांच्या हल्ल्याने मृत झाल्याबाबतची घटना कळल्याचे दोन दिवसांचे आत वन परिक्षेत्र अधिकारी यांनी सदर घटनेबाबत महसूल मंडळ अधिकारी / नायब तहसिलदार यांना सूचना द्याव्यात व मृत व्यक्तीबाबतची सर्व कागदपत्रे देण्यात यावीत. दोन दिवसांचे आत सूचना न दिल्यास, संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

४. उपरोल्लेखित शासन निर्णयांमध्ये अर्थ सहाय्य मंजूर करण्याचे अधिकार फक्त उपवनसंरक्षक तसेच विभागीय वन अधिकारी या दर्जाच्या अधिका-यापर्यंतच सीमित होते. तथापि, उक्त दर्जाचा अधिकारी जिल्हा स्तरावर असल्याने प्रकरणे निकाली काढून अर्थ सहाय्याची रक्कम अदा करण्यास विलंब होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आल्यावर शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी ०४१३/प्र.क्र.१२३/फ-१, दिनांक २५.११.२०१३ अन्वये सदरचे अधिकार संबंधित परिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक यांना प्रदान करण्यात आले. सदर शासन निर्णय दिनांक २५.११.२०१३ पासून अंमलात आला.

५. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३३७/फ-१, दिनांक १६.०१.२०१५** अन्वये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात व्यक्ती मृत झाल्यास देय अर्थसहाय्याची रक्कम रु. ८, ००,०००/- (रु.आठ लाख फक्त) इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे व्यक्ती किरकोळ जखमी झाल्यास देय अर्थसहाय्याची मर्यादा रु. १५,०००/- (रु.पंधरा हजार फक्त) इतकी निश्चित करण्यात आली. याव्यतिरिक्त खालील विशिष्ट अटीचा समावेश करण्यात आला.

**५.१.** वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत झाल्यास व्यक्तीच्या वारसांना देय अर्थसहाय्याची रक्कमेपैकी रु. १, ००,०००/- (रु.एक लाख फक्त) अर्थसहाय्य म्हणून देण्यात येईल आणि उर्वरित रक्कम दिनांक २९.०५.२०१३ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे देय असलेल्या व्यक्तींच्या नांवे त्यांच्या राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या दरमहा व्याज देणा-या संयुक्त खात्यात ठेव रक्कम (फिक्स डिपॉझिट) जमा करण्यात यावी. सदर शासन निर्णय दिनांक १६.०१.२०१५ पासून लागू करण्यात आला आहे.

## ब- वन्यप्राण्यांमुळे पशुधनहानी प्रकरणी नुकसान भरपाई.

६. वाघ, बिबट, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, हत्ती, मगर व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे गाय, बैल, म्हैस, मेंढी, बकरी किंवा इतर पशुधनाचा मृत्यू झाल्यास / जखमी झाल्यास अनुज्ञेय नुकसान भरपाईची रक्कम. [**शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१००८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक ०२.०७.२०१० (दिनांक** ०२.०७.२०१० पासून लागू)]

| क्रमांक (१) | पशुधनाचे (पाळीव प्राण्याचे) नाव (२) | देय असलेल्या नुकसान भरपाईची रक्कम (३) |
|---|---|---|
| १ | गाय म्हैस, बैल यांचा मृत्यू झाल्यास | बाजार भाव किंमतीच्या ७५% किंवा रु. १००००/- (रु.दहा हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| २ | मेंढी, बकरी व इतर पशुधन* यांचा मृत्यू झाल्यास {*वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कलम २(१८-अ) प्रमाणे} | बाजार भाव किंमतीच्या ७५% किंवा रु. ३०००/- (रु.तीन हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| ३ | गाय, म्हैस, बैल या जनावरांना कायम अपंगत्व आल्यास | बाजार भाव किमतीचे ५०% किंवा रु.३०००/- (रुपये तीन हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम. |
| ४ | गाय, म्हैस, बैल, मेंढी, बकरी व इतर पशुधन जखमी झाल्यास | औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात यावा. औषधोपचार शासकीय / जिल्हा परिषद पशुचिकित्सालयात करणेत यावा. देय रक्कम मर्यादा बाजार भावाचे २५% किंवा रु.१००० (एक हजार फक्त) प्रति जनावर यापैकी कमी असणारी रक्कम. उक्त नुकसान भरपाई पशुवैद्यकीय अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारे देण्यात यावी. |

उपरोक्त नुकसान भरपाई खालील अटी व शर्तीच्या अधीन अनुज्ञेय राहील.

६.१. जनावर मालकाने जनावर मेल्यापासून किंवा घटना घडल्यापासून ४८ तासाच्या आत जवळील वन अधिका-याला / कर्मचा-याला कळविले पाहिजे.

६.२. वन्यप्राण्याने ज्या ठिकाणी जनावर मारले असेल त्या ठिकाणावरुन जनावराचे शव लोकांनी हलविता कामा नये.

६.३. जनावराचा ज्या ठिकाणी मृत्यू / जनावर जखमी / अपंग झाले असेल त्या ठिकाणापासून १० कि.मी. भागात कोणत्याही वन्यप्राण्याचा ६ दिवसापर्यंत विष देऊन मृत्यू झालेला नसावा.

६.४. हल्ल्याची बातमी मिळाल्यानंतर संबंधित वनपाल यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तातडीने पंचनामा करावा. तथापि, जनावराचा मृत्यू कोणत्या वन्यप्राण्याचे हल्ल्याने झाला याची तपासणी वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिका-याकडून करण्यात येऊन द्यावयाची नुकसान भरपाई रक्कमही त्यांचेकडून ठरविण्यात यावी.

६.५. जनावर मालकाला देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करणारा अधिकारी उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

६.६. संबंधितांना देण्यात येणारी अर्थसहाय्याची रक्कम रेखांकित धनादेशाव्दारे देण्यात यावी.

७. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी ०४१३/प्र.क्र.१२३/फ-१, दिनांक २५.११.२०१३** अन्वये नुकसान भरपाई मंजूर करण्याचे अधिकार उपवनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी यांच्याबरोबरच संबंधित परिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक यांनाही प्रदान करण्यात आले. सदर शासन निर्णय दिनांक २५.११.२०१३ पासून अंमलात आला.

८. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-९१५/प्र.क्र.३०५/फ-१, दिनांक ११.११.२०१६** अन्वये वाघ, बिबट, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती व रानकुत्रे (ढोल) यांच्या हल्ल्यामुळे पशुधन मृत/अपंग/जखमी झाल्यास खालीलप्रमाणे अर्थसहाय्य निर्धारित करण्यात आले आहे. (दिनांक ११.११.२०१६ पासून लागू)

| क्रमांक (१) | पशुधनाचे (पाळीव प्राण्याचे) नाव (२) | देय अर्थसहाय्य (३) |
|---|---|---|
| १ | गाय म्हैस, बैल यांचा मृत्यू झाल्यास | बाजार भाव किंमतीच्या ७५% किंवा रु. २५०००/- (रु. पंचवीस हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| २ | मेंढी, बकरी व इतर पशुधन* यांचा मृत्यू झाल्यास {*वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील कलम २(१८-अ) प्रमाणे} | बाजार भाव किंमतीच्या ७५% किंवा रु. ६०००/- (रु. सहा हजार फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम |
| ३ | गाय, म्हैस, बैल या जनावरांना कायम अपंगत्व आल्यास | बाजार भाव किमतीचे ५०% किंवा रु.७५००/- (रुपये सात हजार पाचशे फक्त) यापैकी कमी असणारी रक्कम. |

| | | |
|---|---|---|
| ४ | गाय, म्हैस, बैल, मेंढी, बकरी व इतर पशुधन जखमी झाल्यास | औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात यावा. औषधोपचार शासकीय / जिल्हा परिषद पशुचिकित्सालयात करणेत यावा. देय रक्कम मर्यादा बाजार भावाचे २५% किंवा रु.२५००/- (रु. दोन हजार पाचशे फक्त) प्रति जनावर यापैकी कमी असणारी रक्कम. उक्त नुकसान भरपाई पशुवैद्यकीय अधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राचे आधारे देण्यात यावी. |

८.१. सदर अर्थसहाय्य खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल.

८.१.१. जनावर मालकाने जनावर मेल्यापासून किंवा घटना घडल्यापासून ४८ तासाच्या आत जवळील वन अधिका-याला / कर्मचा-याला कळविले पाहिजे.

८.१.२. वन्यप्राण्याने ज्या ठिकाणी जनावर मारले असेल त्या ठिकाणावरुन जनावराचे शव लोकांनी हलविता कामा नये.

८.१.३. जनावराचा ज्या ठिकाणी मृत्यू / जनावर जखमी / अपंग झाले असेल त्या ठिकाणापासून १० कि.मी. भागात कोणत्याही वन्यप्राण्याचा ६ दिवसापर्यंत विष देऊन मृत्यू झालेला नसावा.

८.१.४. हल्ल्याची बातमी मिळाल्यानंतर संबंधित वनपाल यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन तातडीने पंचनामा करावा. तथापि, जनावराचा मृत्यू कोणत्या वन्यप्राण्याचे हल्ल्याने झाला याची तपासणी वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिका-याकडून करण्यात येऊन द्यावयाची नुकसान भरपाई रक्कमही त्यांचेकडून ठरविण्यात यावी.

८.१.५. जनावर मालकाला देण्यात येणारी अर्थ सहाय्याची रक्कम मंजूर करणारा अधिकारी सहाय्यक वनसंरक्षक या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचा नसावा.

८.१.६. संबंधितांना देण्यात येणारी अर्थसहाय्याची रक्कम ईएफटी/ ईजीएस/ एनईएफटी/ आरटीजीएस व्दारे अदा करण्यात यावी / बँक खात्यात जमा करण्यात यावी.

## क - वन्यप्राण्यांमुळे पिक नुकसानी प्रकरणी नुकसान भरपाई.

९. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएनपी-१०९४/प्र.क्र.११५/फ-१, दिनांक २३.०८.२००४** अन्वये वन्यप्राण्यांपासून शेतपिकांचे नुकसानीबाबत अनुज्ञेय नुकसान भरपाई संबंधात पुढील निर्देश आहेत.

९.१. राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा व हत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतातील पिकांच्या नुकसानीची नुकसान भरपाई देण्यात यावी.

९.२. नुकसान भरपाईचा दर रु.२०००/- प्रति हेक्टर पर्यन्त असावा. व त्याची कमाल मर्यादा रु.५०००/- इतकी प्रतिकुटुंब प्रतिवर्ष एवढी असावी.

९.३. नुकसान भरपाई देण्यासाठी पुढील पध्दत अवलंबिण्यात यावी.

९.३.१. पीक नुकसानीची तक्रार अधिकारक्षेत्र असलेले नजीकचे वनरक्षक, वनपाल अगर वनपरिक्षेत्राधिकारी यांचेपैकी कोणाकडेही घटना घडल्यापासून तीन दिवसात करावी.

९.३.२. त्याची शहानिशा संबंधित वनपाल, सरपंच व ग्रामसेवक/तलाठी या तीन सदस्यांच्या समितीमार्फत १० दिवसांच्या आत करण्यात येईल. त्यासाठी जागेवर जाऊन पंचनामा करणे, नुकसान क्षेत्राची मोजणी करणे, पुरावे तपासणे व नुकसानीचे मूल्य ठरविणे हे या समितीकडून अपेक्षित आहे.

९.३.३. प्रत्येक प्रकरणी नुकसान भरपाई देण्याचे आदेश संबंधित उपवनसंरक्षक यांनी घटनेच्या तारखेपासून ९० दिवसांचे आंत काढावे.

९.३.४. उपवनसंरक्षक यांनी आदेश काढल्यानंतर एक महिन्याचे आंत बाधित व्यक्तीस रकमेचा धनादेश हस्तांतरित करावा.

९.४. याबाबत असाही निर्णय घेण्यात आला की, खालील प्रकरणे नुकसानभरपाईसाठी अपात्र राहतील.

९.४.१. वनजमिनीवर अतिक्रमणाव्दारे करण्यात येणारी शेती.

९.४.२. भारतीय वन अधिनियम किंवा वन्यजीव (संरक्षण) अधिनियमांतर्गत ज्यांचे विरुध्द गुन्हा नोंदविला गेला आहे अशा व्यक्तीची शेती.

९.४.३. ज्या कुटुंबाची ४ पेक्षा अधिक गुरे मुक्त चराईसाठी जंगलात जातात त्या कुटुंबाची शेती.

९.४.४. ज्या व्यक्तींना पीक संरक्षणार्थ बंदूक परवाने देण्यात आले आहेत अशा व्यक्तींच्या शेतीची नुकसानी.

९.४.५. मागील एक महिन्याचे काळात वन्यप्राण्यांच्या शिकारीची घटना झालेली गांवे.

१०. शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१००४/प्र.क्र.२१९/फ-१, दिनांक ०२.०६.२००६ अन्वये वन्यहत्तींनी शेतपिकांच्या व फळबागांच्या केलेल्या नुकसानीबाबत द्यावयाच्या आर्थिक मदतीच्या दरात वाढ करण्यात आली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| बाब | या शासन निर्णयानुसार देण्यात यावयाची आर्थिक मदत |
|---|---|
| **(१) शेतपिके :-**<br>नुकसान रु.२०००/- पर्यंत झाल्यास | पूर्ण |
| नुकसान रु.२,००१/- ते १०,०००/- पर्यंत झाल्यास | रु.२०००/- अधिक त्यापेक्षा जास्तीच्या नुकसानीच्या ५०% रक्कम (रु.६,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| नुकसान रु.१०,०००/- पेक्षा जास्त झाल्यास | रु.६०००/- अधिक रुपये १०,०००/- पेक्षा जास्त नुकसानीच्या ३०% रक्कम (रुपये १५,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| **(२) फळझाडे :-**<br>नारळ | रु.२,०००/- प्रति झाड |
| सुपारी | रु.१,२००/- प्रति झाड |
| कलमी आंबा | रु.१,६००/- प्रति झाड |

| | |
|---|---|
| केळी | रु.४८/- प्रति झाड |
| ऊस | रु.४००/- प्रति टन |
| इतर फळझाडे | रु.२००/- प्रति झाड |

१०.१. तसेच वन्यहत्तीमुळे शेतपिक व फळझाडे नुकसानी संदर्भात पुढील अटी निश्चित करण्यात आल्या आहे.

१०.१.१. फळबागांच्या नुकसानीबाबतची आर्थिक मदत ही शेतपिकांच्या संदर्भातील मदतीव्यतिरिक्त असेल.

१०.१.२. ही मदत प्रती हेक्टरी न राहता प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीवर अवलंबून राहील.

१०.१.३. सदरची मदत कसत असलेल्या शेतक-यास वा मालकास देय राहील.

१०.१.४. शेतपिकांची / फळझाडांची नुकसानीची शहानिशा करण्याकरीता शासन निर्णय दि. २३.८.२००४ मध्ये नमूद असलेल्या समितीमध्ये कृषी अधिकारी / फलोत्पादन अधिकारी यांचा समावेश करण्यात आला.

१०.१.५. वरील मदतीव्यतिरिक्त नुकसानग्रस्त शेतक-यांना वनविभागाच्या रोपवाटिकेतून नुकसान झालेल्या फळझाडांच्या संख्येइतकी फळझाडे उपलब्धतेनुसार विनामूल्य पुरविण्यात यावीत.

१०.१.६. ही मदत पूर्वोदाहरण म्हणून इतर कोणत्याही प्रकरणी वापरता येणार नाही.

१०.१.७. सदर आर्थिक मदत सन २००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली.

११. शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१००४/प्र.क्र.२१९/फ-१, दिनांक ०८.०१.२००८ अन्वये बंदूक परवाने दिलेल्या व्यक्तींना वन्यहत्तींनी केलेल्या शेती नुकसान प्रकरणी सुध्दा नुकसान भरपाईसाठी पात्र करण्यात आले. तसेच वन्यहत्ती पासून होणा-या ऊस पिकांचे नुकसानीबाबत विशेष दिशानिर्देश जारी करण्यात आले, ते खालीलप्रमाणे.

११.१. ज्या व्यक्तींना पीक संरक्षणार्थ बंदूक परवाने देण्यात आले आहेत अशा व्यक्तींना देखील वन्यहत्तींनी केलेल्या शेतीच्या / फळबागांच्या नुकसानीसाठी नुकसान भरपाई विहित दरानुसार व अन्य शर्तींच्या अधीन देय असेल, मात्र वन्य हत्तींना इजा वा त्याची शिकार संबंधितांकडून झालेली नसावी.

११.२. वन्यहत्तींपासून होणारे ऊस पिकांचे नुकसानीसाठी रुपये ४००/- प्रती मे.टन असे वजनावर आधारित न ठेवता गडहिंग्लज, चंदगड तसेच ज्या तालुक्यामध्ये हत्तीकडून ऊस पिकांचे नुकसान होईल त्या तालुक्याच्या मागील ८ वर्षाची कृषी विभागाने काढलेल्या ऊसाच्या उत्पादकतेवरुन सरासरी उत्पादकता काढावी व त्यानुसार ऊस पिकाची नुकसान भरपाई क्षेत्रावर आधारित उत्पादकतेनुसार (प्रती मे.टन रु.४००/- प्रमाणे गणना करुन) देण्यात यावी.

१२. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-१००८/प्र.क्र.२७०/फ-१, दिनांक** ०२.०७.२०१० अन्वये रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतातील पिकांच्या नुकसानीची भरपाई खालीलप्रमाणे निर्धारित करण्यात आली.

| अ.क्र. | बाब | द्यावयाची आर्थिक मदत |
|---|---|---|
| १ | नुकसान रु.२०००/- पर्यंत झाल्यास | पूर्ण परंतु किमान रु.५००/- |
| २ | नुकसान रु २,००१/- ते १०,०००/- पर्यंत झाल्यास | रु.२०००/- अधिक त्यापेक्षा जास्तीच्या नुकसानीच्या ५०% रक्कम (रु.६,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ३ | नुकसान रु.१०,०००/- पेक्षा जास्त झाल्यास | रु.६,०००/- अधिक रु.१०,०००/- पेक्षा जास्त नुकसानीच्या ३० टक्के रक्कम (रु.१५,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ४. | ऊस | रु.४०० प्रती मे.टन |

त्याचप्रमाणे वन्यहत्ती व रानगवे यांनी फळबागांच्या केलेल्या नुकसानीबाबत खालीलप्रमाणे अर्थसहाय्य देण्यात यावे.

| बाब | | द्यावयाची आर्थिक मदत |
|---|---|---|
| फळझाडे | नारळ | रुपये २,०००/- पर्यंत प्रति झाड |
| | सुपारी | रुपये १,२००/- पर्यंत प्रति झाड |
| | कलमी आंबा | रुपये १,६००/- पर्यंत प्रति झाड |
| | केळी | रुपये ४८/- पर्यंत प्रति झाड |
| इतर फळझाडे | | रुपये २००/- पर्यंत प्रति झाड |

१२.१. तसेच खालील नवीन अट अंतर्भूत करण्यात आली.

"प्रत्येक प्रकरणी नुकसान भरपाई देण्याचे आदेश संबंधित उपवनसंरक्षक यांनी घटनेच्या ३० दिवसांचे आंत काढावे."

१२.२. तसेच शासन निर्णय दिनांक २३.०८.२००४ व ०२.०६.२००६ च्या शासन निर्णयातील दिलेल्या अटींपैकी बंदूक परवानासंबंधी अटीत सुधारणा करुन पुढील अट घालण्यात आली.

"ज्या व्यक्तींना पिक संरक्षणार्थ बंदूक परवाने देण्यात आलेले आहेत, अशा व्यक्तींच्या शेतीची नुकसान भरपाई विहित दराने वन्यहत्ती किंवा रानगवा किंवा इतर वन्यप्राणी यांना इजा किंवा त्यांची शिकार संबंधिताकडून झाली नसल्यास अनुज्ञेय राहील."

१३. याच शासन निर्णयान्वये गिधाडाव्दारे नारळांची नुकसान भरपाईबाबत नुकसान भरपाई देण्याचे धोरण ठरविण्यात आले. ते खालीलप्रमाणे -

१३.१. गिधाडांव्दारे प्रजननासाठी नारळाच्या झाडांचा मोठया प्रमाणात वापर केला जात असल्याने घरटयामधील गिधाडाच्या विष्टेमुळे नारळांचे उत्पन्न घटते व शेतक-यांचे नुकसान होते. त्यामुळे शेतकरी अशा झाडांवर असलेली घरटी नष्ट करतात व पर्यायाने त्यामुळे गिधाडाची अंडी - पिल्ले नष्ट होतात. गिधाडांची घरटी असलेल्या नारळ झाडासाठी प्रती हंगाम खालीलप्रमाणे व पुढील अटींवर नुकसान भरपाई देण्यात यावी -

**१३.१.१.** नारळाचे मागील हंगामातील प्रती झाड उत्पादन संबंधित कृषी अधिका-यांकडून उपलब्ध करुन घ्यावे. त्यानुसार ज्या झाडावर गिधाडाचे घरटे असेल त्या झाडाच्या उत्पादनात चालू हंगामात झालेली घट विचारात घेऊन प्रती नारळ रु.७/- प्रमाणे नुकसान भरपाई परिगणीत करण्यात यावी.

**१३.१.२.** देण्यात येणारी नुकसान भरपाई प्रती हंगाम प्रती झाड रु.४००/- पेक्षा अधिक असता कामा नये.

**१३.१.३.** गिधाडाचे घरटे नारळाच्या झाडावर असल्याचे आढळल्यावर शेत मालकाने तसे स्थानिक वनपरिक्षेत्र कार्यालयास कळवावे. सदर बाबीची वनक्षेत्रपाल दर्जाच्या अधिका-याने खात्री केल्यावर नुकसान भरपाईचे मान्यतेबाबतचा निर्णय संबंधित उपवनसंरक्षक यांच्या मान्यतेनंतर अर्जदारास कळविण्यात येईल.

**१३.१.४.** गिधाडांच्या विणीचा हंगाम संपेपर्यंत शेत मालकाने घरटयास संरक्षण द्यावे. याबाबत पाहणी करुन खात्री झाल्यावर नुकसान भरपाई देण्यात येईल.

**१३.१.५.** अर्थसहाय्याची रक्कम केवळ रेखांकित धनादेशाव्दारे अदा करण्यात यावी.

**१३.१.६.** सदर शासन निर्णय दिनांक ०२.०७.२०१० पासून लागू करण्यात आला.

**१४. शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दिनांक ०५.०९.२०१३** अन्वये नुकसान भरपाईचे दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली.

**१४.१.** राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतपिकाला किंवा फळबागांना नुकसान झाल्यास खालीलप्रमाणे वाढीव नुकसान भरपाई देण्यात यावी.

**शेतपिक**

| अ.क्र. | बाब | द्यावयाची आर्थिक मदत |
|---|---|---|
| १ | नुकसान रुपये २०००/- पर्यंत झाल्यास | पूर्ण परंतु किमान रुपये ७००/- |
| २ | नुकसान रुपये २,००१/- ते रुपये १०,०००/- पर्यंत झाल्यास | रुपये २०००/- अधिक त्यापेक्षा जास्तीच्या नुकसानीच्या ७५% रक्कम (रुपये ८,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ३ | नुकसान रुपये १०,०००/- पेक्षा जास्त झाल्यास | रुपये ८,०००/- अधिक रुपये १०,०००/- पेक्षा जास्त नुकसानीच्या ४०% रक्कम (रुपये १८,०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ४ | ऊस | रुपये ४०० प्रती मे.टन |

**फळबाग**

| बाब | | द्यावयाची आर्थिक मदत |
|---|---|---|
| फळझाडे | नारळ | रुपये २,४००/- पर्यंत प्रति झाड |
| | सुपारी | रुपये १,४००/- पर्यंत प्रति झाड |

| | | |
|---|---|---|
| | कलमी आंबा | रुपये १,८००/- पर्यंत प्रति झाड |
| | केळी | रुपये ६०/- पर्यंत प्रति झाड |
| इतर फळझाडे | | रुपये २५०/- पर्यंत प्रति झाड |

१४.२. सदर शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१३ पासून लागू करण्यात आला.

१५. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी ०४१३/प्र.क्र.१२३/फ-१, दिनांक २५.११.२०१३** अन्वये नुकसान भरपाई मंजूर करण्याचे अधिकार उपवनसंरक्षक व विभागीय वन अधिकारी यांच्याबरोबरच संबंधित परिक्षेत्राचे प्रभारी सहाय्यक वनसंरक्षक यांनाही प्रदान करण्यात आले. सदर शासन निर्णय दिनांक २५.११.२०१३ पासून अंमलात आला.

१६. **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दिनांक ०९.०७.२०१५** अन्वये नुकसान भरपाईचे दरात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली.

१६.१. राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वन्यहत्ती या वन्यप्राण्यांपासून शेतपिकाला किंवा फळबागांना नुकसान झाल्यास खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

**पीक नुकसानीपोटी द्यावयाचे आर्थिक सहाय्य**

| अ.क्र. | तपशील | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | शेतपिकाचे नुकसान रु.१००००/- पर्यंत झाल्यास | पूर्ण किंमत परंतु किमान रु.१०००/- |
| २ | शेतपिकाचे नुकसान रु.१००००/- पेक्षा जास्त | रु.१००००/- अधिक रु.१००००/- चे वरील नुकसानीचे ८०% रक्कम (रु.२५०००/- चे कमाल मर्यादेत) |
| ३ | ऊस पिकाचे नुकसान | रु.८००/- प्रति मे.टन प्रमाणे (रु.२५०००/- चे मर्यादेत) |

**फळबागांच्या केलेल्या नुकसानीपोटी द्यावयाचे आर्थिक सहाय्य**

| अ.क्र. | प्रजाती | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | नारळ | रु.४८००/- प्रती झाड |
| २ | सुपारी | रु.२८००/- प्रती झाड |
| ३ | कलमी आंबा | रु.३६००/- प्रती झाउ |
| ४ | केळी | रु.१२०/- प्रती झाड |
| ५ | इतर फळझाडे | रु.५००/- प्रती झाड |

१६.२. नुकसान भरपाई देण्याच्या अटी शासन निर्णय दि. ०२.०७.२०१०, दिनांक ०५.०९.२०१३ व दिनांक २५.११.२०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील. सदर शासन निर्णय दिनांक ०९.०७.२०१५ पासून अंमलात आला.

१७. वन्यप्राण्यांपासून होणाऱ्या पिकांच्या, फळझाडांच्या झालेल्या नुकसानीबद्दल आर्थिक सहाय्य अदा करण्यासाठी अवलंबिण्यात येणाऱ्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा व पंचनाम्यात सुलभता येण्यासाठी

नेमलेल्या समितीची फेररचना **शासन निर्णय डब्ल्युएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१ दि. २८.०९.२०१५** अन्वये करण्यात आली.

१७.१ सबंधित शेतकरी पीक नुकसानीची तक्रार सर्व कागदपत्र व पुराव्यासह अधिकारक्षेत्र असलेले नजीकचे वनरक्षक, वनपाल अगर वन परिक्षेत्र अधिकारी यांचेपैकी कोणाकडेही घटना घडल्यापासून ०३ (तीन) दिवसाचे आंत करतील.

१७.२ प्रत्येक प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर (१) वनरक्षक (२) कृषी सहाय्यक (३) तलाठी अशी तीन सदस्यांची समिती नुकसानीची शहानिशा करणे, जागेवर जाऊन पंचनामा करणे, नुकसान क्षेत्राची मोजणी करणे, पुरावे तपासणे व नुकसानीचे मूल्य ठरविणे इत्यादी सर्व कार्यवाही करून आपला अहवाल १४ (चौदा) दिवसांचे आंत संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी यांना सादर करतील.

१७.३ समितीने सादर केलेला अहवाल संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी संबंधित सहाय्यक वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक यांना ०४ (चार) कामाच्या दिवसांच्या आंत सादर करतील.

१७.४ वन परिक्षेत्र अधिकारी यांनी समितीचा अहवाल सादर केल्यानंतर संबधित सहाय्यक वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक प्रत्येक प्रकरणी आर्थिक सहाय्य देण्याचे आदेश ०४ (चार) कामाच्या दिवसांचे आंत किंवा घटनेची तक्रार प्राप्त झाल्यापासून २३ दिवसांचे आंत काढतील.

१७.५ संबंधीत सहाय्यक वनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक यांनी आदेश काढल्यानंतर ०३ (तीन) कामाचे दिवसांचे आंत किंवा घटनेची तक्रार प्राप्त झाल्यापासून २६ दिवसांचे आंत जे अगोदर घडेल, आर्थिक सहाय्याची रक्कम बाधित व्यक्तीच्या खात्यात जमा करतील किंवा रेखांकित धनादेश हस्तांतरीत करतील.

१८. वन्यप्राण्यांमुळे फळबाग व शेतपिकांचे नुकसानीसंदर्भात उपरोक्त शासन निर्णयान्वये संत्री व मोसंबी या फळझाडांकरीता वेगळयाने तरतूदी करण्यात आलेली नव्हती. विदर्भातील संत्री व मोसंबी हया फळझाडांचे वन्यप्राण्यांमुळे मोठया प्रमाणावर नुकसान होत आहे, मात्र इतर फळझाडांकरीता असलेली नुकसान भरपाईची तरतूद संत्री व मोसंबीकरीता अपुरी असल्यामुळे वन्यप्राण्यांच्या अस्तित्वाबद्दल जनसामान्यात निर्माण होणारे प्रतिकूल मत विचारात घेता सदर रकमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार **शासन निर्णय क्रमांक डब्ल्यूएलपी-२०१२/प्र.क्र.३२६/फ-१, दिनांक २३ डिसेंबर, २०१५** अन्वये या फळझाडांकरीता खालीलप्रमाणे नुकसान भरपाई निर्धारित करण्यात आली.

१८.१. राज्यातील रानडुक्कर, हरिण (सारंग व कुरंग), रानगवा, रोही (निलगाय), माकड, वानर तसेच वनहत्ती या वन्यप्राण्यांपासून संत्री व मोसंबीच्या फळबागांचे नुकसान झाल्यास खालीलप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

**फळबागांच्या केलेल्या नुकसानीपाटी द्यावयाचे आर्थिक सहाय्य**

| अ.क्र. | प्रजाती | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| १ | संत्री व मोसंबी | रु.२४००/- प्रती झाड |

१७.२. सदर शासन निर्णय दिनांक २३.१२.२०१५ पासून अंमलात आला.

१९. सदर शासन परिपत्रक उपरोल्लेखित शासन निर्णयांमधील तरतूदी तसेच त्यात वेळोवेळी झालेला बदलाबाबतचे संकलन असून कोठेही तफावत आढळल्यास मूळ शासन निर्णयातील तरतूदी अंतिम राहतील याची नोंद घ्यावी.

२०. उपरोल्लेखित विविध शासन निर्णय ज्या दिनांकापासून अंमलात आहे, त्या दिनांकाचा उल्लेख या परिपत्रकात करण्यात आला असून संबंधित प्राधिका-यांनी याकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन प्रकरणे हाताळावीत.

२१. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक २०१६११२८१५४०५३२११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(अरविंद आपटे)
विशेष कार्य अधिकारी
महसूल व वनविभाग

प्रत माहिती आणि उचित कार्यवाहीसाठी :-

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महासंचालक, माहिती व प्रसिध्दी, मंत्रालय, मुंबई.
९) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, नागपूर.
१२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई (बोरीवली).

१५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), सर्व.
१६) मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे.
१७) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
१८) मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली.
१९) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.
२०) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर.
२१) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर.
२२) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया
२३) वनसंरक्षक (वन्यजीव), नाशिक.
२४) सर्व जिल्हाधिकारी.
२५) सर्व पोलिस अधीक्षक.
२६) उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
२७) उपवनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे
२८) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), अकोला/औरंगाबाद
२९) विभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद/बीड / हिंगोली /परभणी/ चिपळूण.
३०) उप विभागीय संगमनेर/मालेगाव/ भोर.
३१) सर्व जिल्हा कृषी अधिकारी.
३२) महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
३३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३४) वित्त विभाग (व्यय-१० कार्यासन), मंत्रालय, मुंबई - ३२.
३५) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
३६) वन कक्षातील सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३७) फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती).

आपली सेवा आमचे कर्तव्य

राज्य लोकसेवा हक्क आयोग

राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासन इमारत, ७ वा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

ई-मेल-- ccrts@maharashtra.gov.in दूरध्वनी क्र. ०२२ -२२८३२३४६

क्र . संकीर्ण -२०२१/स.क्र. ९९२/मुसेहआ दिनांक :- ३० ऑगस्ट, २०२१

प्रति ,

सचिव,
महसूल व वन विभाग (वने),
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- वन्य प्राण्यांकडून झालेल्या शेतपिकाची नुकसान भरपाई मिळणेबाबत.
ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत भद्रावती तालुक्यातील बाधीत शेतकरी

मा. महोदय,

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत भद्रावती तालुक्यातील बाधीत शेतकरी यांनी वन्य प्राण्यांकडून झालेल्या शेतपिकाची नुकसान भरपाई मिळणेबाबत राज्य मुख्य लोकसेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग यांच्याकडे प्राप्त निवेदनाची प्रत सहपत्रासह सोबत जोडली आहे.

२. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत भद्रावती तालुक्यातील बाधीत शेतकरी यांनी वन्य प्राण्यांकडून झालेल्या शेतपिकाची नुकसान भरपाई मिळणेबाबत राज्य लोकसेवा हक्क आयोगाकडे तक्रार केली आहे. अर्जदार यांनी उपस्थित केलेला विषय महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ तरतूदीनुसार अधिसूचित आहे. अर्जदारास विहित मुदतीत सेवा प्राप्त करण्याचा हक्क राज्य लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ मधील कलम ४ नुसार आहे. कलम ५ प्रमाणे विहित मुदतीत सेवा पुरविणे हे पदनिर्देशित अधिका-यावर बंधनकारक आहे. तरी सदर तक्रारीची शहानिशा आपल्या कार्यालयाकडून करुन आपला सविस्तर अहवाल आयोगास सादर करण्याचे निर्देश मा. मुख्य आयुक्त यांनी दिले आहेत याची नोंद घ्यावी.

आपला,

निर्गमित
राज्य लोकसेवा हक्क आयोग
दिनांक :- १|९|२१

सोबत- वरीलप्रमाणे.

(ह. भा. थोरात)
कक्ष अधिकारी,
राज्य लोकसेवा हक्क आयोग,

प्रत,

प्रधान मुख्य वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांना कळविण्यात येते सदर तक्रार प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन झालेल्या विलंबाबत आपला अहवाल सादर करावा.

कार्यासन (संग्रहार्थ)

C:\Users\anil.ingale\Desktop\रा.मुआ. तक्रार- पत्र व नोट २०२१\अधिसूचित आहे २०२१.docx

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग

महाराष्ट्र राज्यामध्ये, 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015' या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे काम महाराष्ट्र लोकसेवा आयोग करते. काही सेवा मिळण्यास उशीर झाला किंवा काही कारणांमुळे सेवा नामांजूर करण्यात आली तर आपण प्रथम आणि द्वितीय अपील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आणि तिसरे व शेवटचे अपील आयोगाकडे करू शकतो. विभागानुसार कार्यालयाचे अधिकारी आणि कार्यालयाचा पत्ता याची माहिती सोबत दिली आहे. आयोगाबद्दल अधिक माहिती https://aaplesarkar.mahaonline.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**महराष्ट्र लोकसेवा आयोगाबद्दलचे काही ठळक मुद्दे:**

- 'आपले सरकार सेवा केंद्र' ही महराष्ट्र सरकारची मान्यताप्राप्त केंद्रे आहेत. इथे सार्वजिनक सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. ही केंद्रे प्रामुख्याने सर्व तहसील कार्यालये, ग्रामपंचायतीची कार्यालये, महानगरपालिका आणि नगरपरिषदांसारख्या शहरी स्थानिक संस्था अशा ठिकणी आहेत.
- प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण केंद्राला, त्यांच्याकडून पुरवल्या जाणाऱ्या लोकसेवांची यादी, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिलीय अधिकारी यांची नावे, शुल्क याची माहिती कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि ऑनलाइन पोर्टल (असल्यास) त्यावर असणे बंधनकारक आहे. ही माहिती मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेत उपलब्ध असते. अशी माहिती उपलब्ध नसल्यास आपण त्याची मागणी करू शकतो व मुख्य आयुक्त किवा संबंधित आयुक्त त्याची दखल घेऊ शकतात.
- सेवा मिळवण्यासाठीचा केलेला अर्ज, फेटाळल्याचा आदेश मिळाल्यानंतर किंवा सेवेची ठरलेली कालमर्यादा संपल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत प्रथम अपील करता येते.
- आपण दिलेल्या प्रथम तसेच द्वितीय अपीलची / अर्जाची लेखी पोचपावती देण्याची जबाबदारी पदनिर्देशित अधिकारी किंवा नेमलेला लोकसेवा कर्मचारी यांची आहे. पुढील अपील करण्यासाठी लेखी पोच स्वत:कडे असणे आवश्यक आहे. अपील स्वत:च्या हस्ताक्षरात किंवा ऑनलाइन देता येते. अपील सोबत जोडलेल्या कागदपत्रांवर स्वत:ची सही असणे आवश्यक आहे.
- वन्याप्राण्यांच्या हानीमुळे झालेल्या पीक नुकसानीकरिता नुकसानभरपाई मंजुर करणे
  - **प्रथम अपिलीय अधिकारी:-** संबंधित उपवनसंरक्षक/विभागीय वनाधिकारी (प्रादेशिक/वन्यजीव) वनसंरक्षक (वन्यजीव)
  - **द्वितीय अपिलीय अधिकारी:-** संबंधित उपवनसंरक्षक/विभागीय वनाधिकारी (प्रादेशिक/वन्यजीव) व्याघ्र प्रकल्प क्षेत्राचे क्षेत्र संचालक / अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)

## विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्त

| क्रमांक | नाव | विभाग | ई-मेल आयडी | कार्यालयीन पत्ता |
|---|---|---|---|---|
| १) | श्री बलदेव सिंग, भा.प्र.से. (से.नि.) | राज्य सेवा हक्क आयुक्त, कोकण | Crts.konkan@maharashtra.gov.in | कोकण भवन (विस्तार इमारत), 7 वा मजला, कक्ष क्र. 727, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४. |
| २) | श्री दिलीप शिंदे, भा.प्र.से. (से.नि.) | राज्य सेवा हक्क आयुक्त, पुणे | Crtspune@maharashtra.gov.in | तिसरा मजला, घोलेरोड-शिवाजीनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे – 411 005. |
| ३) | श्रीमती चित्रा कुलकर्णी (से.नि. अपर राज्यकर आयुक्त) (वस्तू व सेवा कर) | राज्य सेवा हक्क आयुक्त, नाशिक | Rtsc.nashik@gmail.com | सिंहगड शासकीय विश्रामगृह, चांडक सर्कल, नाशिक ४२२००२. (तात्पुरते कार्यालय) |
| ४) | डॉ किरण जाधव, भा.पो.से. (से.नि.) | राज्य सेवा हक्क आयुक्त, औरंगाबाद | crtsaurangabad@maharashtra.gov.in | राज्य सेवा हक्क आयोग, कनककुंज बिल्डिंग दुसरा मजला, जुबली पार्क ते जी टी एस रोड ,औरंगाबाद |
| ५) | डॉ नारुकुल्ला रामबाबु, भा.व.से. (से.नि.) | राज्य सेवा हक्क आयुक्त, अमरावती | Crtsamravati@maharashtra.gov.in | उर्ध्व वर्धा प्रकल्प वसाहत मार्ग, अमरावती कॅम्प, अमरावती ४४४६०२. |
| ६) | श्री अभय यावलकर, भा.प्र.से. (से.नि.) | राज्य सेवा हक्क आयुक्त, नागपूर | crtsnagpur@maharashtra.gov.in | जुने सेक्रेटरी बिल्डिंग, समाज कल्याण ऑफिस रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१. (तात्पुरते कार्यालय) |

Gokhale Institute of Politics and Economics
(Deemed to be University)

Centre for Sustainable Development

FROM CONFLICT TO COEXISTENCE
संघर्षाकडून सहजीवनाकडे
CENTRE FOR SUSTAINABLE DEVELOPMENT

**वन्य प्राण्यांमुळे होणारे शेतीचे नुकसान कमी होण्यासाठी ...**
**त्यावरील ठोस उपाय योजनांचा अभ्यास व्हावा**
**या उद्देशाने**
**शाश्वत विकास केंद्र- GIPE येथे सर्वेक्षण व अभ्यास सुरु आहे**

**संघर्षाकडून सहजीवनाकडे जाण्यासाठी एकत्रित होऊन प्रयत्न करूया ......**